# नागपूर महानगरपालिका, नागपूर

(आस्थापना शाखा)

जाहिरात क्र./ ६६० /पी.आर

दिनांक :- १०/ ११ /२०२३

## थेट मुलाखत

नागपूर महानगरपालिकेत वित्त विभागातंर्गत मुख्य लेखापरीक्षक शाखेकडून लेखापरीक्षण करणेस्तव, महाराष्ट्र शासनाच्या वित्त व लेखा विभागातून सेवानिवृत्त झालेले खालील पात्रतेचे अधिकारी यांची मनपा लेखापरीक्षण विभागातंर्गत **"कंत्राटी लेखापरीक्षक"** या पदावर कंत्राटी /करार तत्वावर शासन निर्णय १७ डिसेंबर, २०१६ नुसार अनुज्ञेय मासिक पारिश्रमिक तत्वावर प्रथमत: ६ महिन्याच्या कालावधीकरीता, निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करावयाची आहे.

उक्त कामाचा अनुभव असलेल्या इच्छुक सेवानिवृत्त उमेदवारांनी थेट मुलाखती करीता आवश्यक कागदपत्रासह दि. २२ /११/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता, अति.आयुक्त (सामान्य), सिव्हील लाईन, मनपा नागपूर यांचे कार्यालय येथे उपस्थित राहावे.

| अ.क्र | पदाचे नाव | एकुण पद | वयोमर्यादा | पात्रता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | कंत्राटी लेखापरिक्षक | १ | कमाल ६५ वर्षे | १) महाराष्ट्र शासनाच्या वित्त व लेखा विभागात लेखाधिकारी (वर्ग—२) पदावरून सेवानिवृत्त झालेले.<br>२) स्थानिक निधी लेखा / कोषागार कार्यालयात कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |

वरील पदाकरीता इच्छुक उमेदावारांनी दि. २२/ ११ /२०२३ रोजी सकाळी १०.३० ते १२.०० पर्यंतच्या दरम्यान आपले नाव नोंद करावे. विहीत वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांच्या नावाची नोंद करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. पात्र अर्जदाराची मुलाखत त्याच दिवशी लगेच घेण्यात येईल.

**अर्हता:-**

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.

२. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज उपायुक्त (सा.प्र.वि.) नागपूर महानगरपालिका, सिव्हील लाईन, नागपूर यांचेकडे सादर करावेत.

३. वयोमर्यादा विचारात घेतांना दि. २२ / ११ /२०२३ ही तारीख ग्राहय धरण्यात येईल.

४. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा मानधनापोटी होणारा खर्च व्यपद क्र. BI NO.७२(BO३१०१)A२०२००४१०००३ मधून वित्त विभागाच्या आस्थापनेवरुन काढण्यात येईल.

५. उमेदवारांनी त्यांच्या वय, शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती स्वसांक्षाकित करुन जोडाव्यात.

६. उमेदवारांनी अर्ज सादर करुन अर्जासोबत एक फोटो चिकटवावा व एक फोटो संलग्न करावा.

७. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने सोपविलेले विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीशी राहील. व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल, तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती, मान्य असल्याचे बंधपत्र/हमीपत्र उमेदवाराला दयावे लागेल.

Scanned with OKEN Scanner

८. करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.

९. मासिक पारिश्रमिक-शासकीय/निमशासकीय सेवा- सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विहीत कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी कायम राहील.

१०. सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

११. सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी, तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही गुन्हा दाखल नसावा व चारित्र्य चांगले असावे.

१२. कार्यालयीन आवश्यकतेनुसार कामाचे स्वरूपात बदल करण्याचा अधिकार मा. आयुक्त / संबंधीत विभाग प्रमुख यांना राहील.

उपरोक्त पदाकरिता अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावयाचा असून अर्जाचा नमूना व उक्त पदांकरिता आवश्यक अर्हता/अटी/शर्ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे.

हस्ता/- डॉ. अभिजीत चौधरी
आयुक्त तथा प्रशासक
महानगरपालिका, नागपूर

दिनांक :- १० / ११ /२०२३

Scanned with OKEN Scanner

# अर्जाचा नमूना

१. पदाचे नाव :- ..........................................................................

२. अर्जदाराचे नांव :- ..........................................................................

३. पूर्ण पत्ता :- ..........................................................................

..........................................................................

भ्रमणध्वनी क्रमांक :- ..........................................................................

ई-मेल आय डी :- ..........................................................................

४. जन्म दिनांक :- ..........................................................................

५. दि. २२ / ११ /२०२३ ला वय :- ..........................................................................

६. सेवानिवृत्तीचे वेळी धारण केलेले पद व कार्यालय :- ..........................................................................

७. शैक्षणिक पात्रता :- ..........................................................................

८. अ) सेवाकाळातील विभागीय चौकशी सुरु आहे/ होती काय ?

ब) असल्यास विभागीय चौकशीत शिक्षा झाली होती का ?

क) अर्जदाराविरुध्द कोणताही गुन्हा दाखल आहे का ?

ड) गुन्हा दाखल असल्यास गुन्हाबाबत तपशील

९. अनुभव :- ..........................................................................

| अ.क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेल्या पदाचे नाव | कालावधी (पासून-पर्यंत) | कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|
| | | | | |

स्वाक्षरी



Scanned with OKEN Scanner